महाराष्ट्र शासन
उद्योग संचालनालय,
जिल्हा उद्योग केंद्र,बुलढाणा.

## जिल्हास्तरीय निर्यात प्रचालन समिती (DEPC) बैठक दिनांक 26/09/2024 चे इतिवृत्त

जिल्हास्तरीय निर्यात प्रचालन समिती (DEPC) ची बैठक दिनांक 26/09/2024 रोजी दुपारी 3.30 वाजता मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील समितीचे सदस्य हजर होते.

| अ.क्र. | उपस्थित सदस्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| 1 | डॉ.किरण पाटील (भाप्रसे) | अध्यक्ष,जिल्हास्तरीय निर्यात प्रचालन समिती,तथा जिल्हाधिकारी बुलढाणा |
| 2 | कु.स्नेहल वी ढोके | महानिदेशक विदेश व्यापार, अपर महानिदेशक विदेश व्यापार कार्यालय (DGFT) नागपूर (लिंकद्वारे) |
| 3 | श्री.अंकित गुप्ता | CA EY टिम (लिंकद्वारे) |
| 4 | श्री.प्रमोद लांडे | महाव्यवस्थापक,जिल्हा उद्योग केंद्र,बुलढाणा |
| 5 | श्री.सुनिल गो.पाटील | व्यवस्थापक,जिल्हा उद्योग केंद्र,बुलढाणा |
| 6 | श्री.कोमलेंद्र कुमार सिह | जिल्हा अग्रणी बँक अधिकारी,बुलढाणा |
| 7 | श्री.एस.पी.राऊत | प्रादेशिक अधिकारी,म.औ.वि.म.मं,अमरावती (लिंकद्वारे) |
| 8 | श्री.एम.डी.भिवापुरकर | उपविभागीय कार्यालय,एम.पी.सी.बी,अकोला (लिंकद्वारे) |
| 9 | श्री.अशोक अग्रवाल | MIDC असो.चिखली |
| 10 | श्री.एन.एस.पाटील | व्यवस्थापक,जिल्हा उद्योग केंद्र,बुलढाणा |

मा.अध्यक्षांच्या परवानगीने महाव्यवस्थापक, जिउके बुलढाणा यांनी उपस्थित सदस्यांचे स्वागत केले.

1. मा.अध्यक्षांनी बैठकीत सांगितले की, बुलढाणा जिल्हा हा अमरावती विभागात निर्यातीमध्ये प्रथम क्रमांकावर आहे. जिल्हयाचे सन 2023-24 एकुण निर्यात ही 841 कोटी इतकी आहे. जिल्हयात कापुस,ऑरगॅनिक केमिकल्स, साबण हे प्रमुख निर्यात होणार उत्पादने आहेत. तसेच जिल्हयातुन बाग्लादेश,निदरलँड,युके,सिंगापुर,अरब अमरात,युएसए,ब्राझील यासारख्या देशांमध्ये निर्यात होते.
2. जिल्हा निर्यात कक्ष हे जिल्हा उद्योग केंद्र येथे स्थापन करण्यात आले आहे. या कक्षात निर्याताशी संबंधित कागदपत्रे,परवाने तसेच केंद्र,व राज्य शासनाच्या निर्याती संबंधित योजनेची माहिती उद्योजकांना देण्यात येईल.असे मा.अध्यक्षांनी सांगितले.
3. जिल्हयाचा निर्यात आराखडयाचे श्री.अंकित गुप्ता यांनी सादरीकरण केले व सविस्तर चर्चेनंतर मा.अध्यक्षांच्या मान्यतेने जिल्हा निर्यात प्रचालन समितीने मंजुरी प्रदान केली.
4. जिल्हयात महाराष्ट्र औद्योगिक समुह योजनेअंतर्गत 6 औद्योगिक समुह स्थापित झाले आहेत.प्रत्येक तालुक्यात 2 क्लस्टर स्थापित करण्याकरीता,माविम,एमएसआरएलएम,जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा व कृषि कार्यालयास पुढील कार्यवाहीकरीता द्यावी अशा सूचना मा.अध्यक्षांनी दिल्या.

एसबीआय चौक,तहसिल कार्यालयाजवळ चिखली रोड बुलढाणा
दुरध्वनी क्रमांक 07262-242367 E-Mail didic.buldhana@maharashtra.gov.in

5. एसबीआय बँकेने जिल्हयात विदेशी चलनातील व्यवहारासाठी MIDC चिखली व बुलढाणा येथे शाखा स्थापन करणेबाबत प्रस्ताव बँकेचे मुख्यालयास सादर केला आहे.याबाबत विनाविलंब कार्यवाही करुन या शाखा कार्यान्वीत होतील याची दक्षता घ्यावी असे मा.अध्यक्षांनी सूचित केले.
6. टाऊन ऑफ एक्सोर्ट एक्सलन्स दर्जा बुलढाणा जिल्हयास मिळणेबाबत विदेश व्यापार कार्यालय (DGFT) नागपूर यांनी पुढील आवश्यक कार्यवाही करावी तसेच जिल्हयात निर्यातदार व आयातदारांची बैठक आयोजित करावी असे मा.अध्यक्षांनी सूचित केले.
7. जिल्हयातील उत्पादनांना भौगौलिक (GI) मानांकनासाठी प्रक्रिया/मार्गदर्शन मिळणेकरीता कार्यशाळा विदेश व्यापार कार्यालय (DGFT) नागपुर यांनी करावी आयोजित करावी असे मा.अध्यक्षांनी सूचित केले.दर सोमवारी सकाळी 10.30 ते 11.30 दरम्यान ऑनलाईन बैठकीचे आयोजन करुन उद्योजकांचे अडीअडचणीवर निराकरण (DGFT) नागपूर मार्फत केले जात आहे असे श्री.सुनिल पाटील व्यवस्थापक यांनी निदर्शनास आणून दिले.
8. जिल्हयात उद्योजकांना कुशल कामगारांची गरज असल्याने होटेल मॅनेजमेंट व अकाऊंट जिएसटी यासारख्या प्रशिक्षण हे जिल्हा व्यवसाय व प्रशिक्षण विभाग,जिल्हा कौशल्य व विकास विभागाने नियोजन करावे असे निर्देश मा.अध्यक्षांनी दिले. तसेच जिल्हयाची सन 2024-25 मध्ये 1500 कोटीची निर्यातीचे लक्ष मा.अध्यक्षांनी दिले.

महाव्यवस्थापक यांनी उपस्थितांचे आभार मानुन, अध्यक्षांचे परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

महाव्यवस्थापक,जिल्हा उद्योग केंद्र,बुलढाणा
तथा सचिव,जिल्हास्तरीय निर्यात प्रचाल समिति

जिल्हाधिकारी,बुलढाणा
तथा अध्यक्ष,जिल्हास्तरीय निर्यात प्रचालन समिति